जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 SEP 2025
Times of India

# In significant leap, SUK enters top 50 state public varsities in NIRF '25

TIMES NEWS NETWORK

File photo



Shivaji University, Kolhapur

**Kolhapur:** Shivaji University has maintained its position among the top 200 universities across India in the National Institutional Ranking Framework (NIRF) 2025 rankings, with the university making a significant leap to rank among the top 50 state public universities in the country.

Pro-VC Dr Pramod Patil said, "Last year, Shivaji University was included in the rank band of 51-100. This year, Shivaji University has moved further in the ranking and has secured a place in the rank band of 1-50. The university has now reached the 45th spot among the top 50 universities across the country with a score of 51.80."

Savitribai Phule Pune University is at the 11th spot, Mumbai University is at the 12th position and CoEP Technological University, Pune, at the 43rd position in state public university rankings.

SUK vice-chancellor Dr Digambar Shirke said, "Even though the number of participating comprehensive educational institutions is increasing, Shivaji University has increased its position in this ranking. This is the result of the efforts of all departments including teachers and researchers of the university to improve their performance in the last few years as per the NIRF criteria."

The National Institutional Ranking Framework (NIRF) is based on the criteria of teaching-learning process, research and professional activity, student pass rate, efforts made to reach various disadvantaged sections of society including women, and communication and coordination with various stakeholders related to the university.

Along with universities and colleges, the ranking also includes educational institutions in the fields of research institutes, engineering, management, pharmacy, architecture and planning, medical, dental, law, agriculture and allied sectors, innovation, open, skill, state public and sustainable development.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 SEP 2025
लोकमत

# 'टॉप-५०' राज्य विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठ

## 'एन.आय.आर.एफ.' रँकिंगमध्ये उंचावले स्थान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या वतीने गुरुवारी जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ-२०२५) मध्ये शिवाजी विद्यापीठाने देशातील आघाडीच्या २०० विद्यापीठांमध्ये आपले स्थान कायम राखले. राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या यादीत आगेकूच करीत देशातील आघाडीच्या ५० विद्यापीठांमध्ये स्थान प्राप्त केले आहे अशी माहिती विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी दिली.

यावर्षीही १५१-२०० या रँकबँडमध्ये शिवाजी विद्यापीठाचे स्थान कायम आहे. गतवर्षीपासून 'एनआयआरएफ'ने राज्य सार्वजनिक विद्यापीठांची क्रमवारी स्वतंत्रपणे जाहीर करण्यास सुरुवात केली. त्यानुसार गेल्यावर्षी शिवाजी विद्यापीठाचा या यादीमध्ये ५१-१०० या रँकबँडमध्ये समावेश झाला होता.

यंदा शिवाजी विद्यापीठाने क्रमवारीत आणखी आगेकूच करीत कामगिरीच्या बळावर १-५० या रँकबँडमध्ये स्थान प्राप्त केले. देशातील आघाडीच्या ५० विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठ आता ५१.८० गुणांकनासह ४५ व्या स्थानी पोहोचले आहे.

या यादीत महाराष्ट्रातील आणखी तीन विद्यापीठे आहेत. त्यात ११ व्या स्थानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, १२ व्या स्थानी मुंबई विद्यापीठ आणि ४३ व्या स्थानी पुण्याचे सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आहे.

### काय आहेत निकष

राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्कची क्रमवारी अध्यापन- अध्ययन प्रक्रिया, संशोधनपर व व्यावसायिक कृतिशीलता, विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण, महिलांसह विविध वंचित समाजघटकांपर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी करण्यात आलेले प्रयत्न आणि विद्यापीठाशी संबंधित विविध घटकांशी संवाद व समन्वय या निकषांवर क्रमवारी आधारित आहे.



> राष्ट्रीय पातळीवरील क्रमवारीमध्ये शिवाजी विद्यापीठाने मोठी झेप घेऊन अभिमानास्पद कामगिरी नोंदविली आहे. सहभागी होणाऱ्या समग्र शैक्षणिक संस्थांची संख्या वाढती असतानाही शिवाजी विद्यापीठाचे या क्रमवारीतील स्थान उंचावले आहे.
>
> **-डॉ. डी.टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ**

0 5 SEP 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशातील ‘टॉप-५०’ राज्य विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या वतीने जाहीर केलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ-२०२५) मध्ये शिवाजी विद्यापीठाने देशातील आघाडीच्या २०० विद्यापीठांमध्ये स्थान कायम राखले. राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या यादीत आगेकूच करीत देशातील आघाडीच्या ५० विद्यापीठांत स्थान प्राप्त केले, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने गुरुवारी २०२५ साठीची राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्कची क्रमवारी जाहीर केली. शिवाजी विद्यापीठाने क्रमवारीत आणखी आगेकूच करीत १-५० या रँकबँडमध्ये स्थान मिळवले. आघाडीच्या ५० विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठ ५१.८० गुणांकनासह ४५ व्या स्थानी पोहोचले. यादीत ११ व्या स्थानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, १२ व्या स्थानी मुंबई विद्यापीठ तर ४३ व्या स्थानी पुण्याचे सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ आहे.

## क्रमवारीत सलग दहावेळा भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसीचा झेंडा

भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी कोल्हापूरने ‘एनआयआरएफ’ इंडिया रँकिंग २०२५ मध्ये देशात ७८ वे, तर राज्यात १० वे स्थान कायम ठेवले. ‘नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रिडेशन कौन्सिल’ नॅकचे ‘ए प्लस’ व शिक्षण मंत्रालय भारत सरकारमार्फत जाहीर नॅशनल इन्स्टिट्युशनल रँकिग फेमवर्क (एनआयआरएफ) २०२५ च्या राष्ट्रीय स्तरावर ७८ वे स्थान पटकावले होते. क्रमवारीत महाविद्यालयाने सलग दहावेळा स्थान टिकवले, अशी माहिती प्राचार्य डॉ. एच. एन. मोरे यांनी दिली.

> “शिवाजी विद्यापीठाने मोठी झेप घेऊन अभिमानास्पद कामगिरी नोंदविली आहे. सहभागी होणाऱ्या समग्र शैक्षणिक संस्थांची संख्या वाढती असतानाही शिवाजी विद्यापीठाचे स्थान उंचावले. गेल्या काही वर्षांत ‘एनआयआरएफ’च्या निकषांनुसार विद्यापीठातील शिक्षक, संशोधकांसह सर्वच घटकांनी कामगिरी उंचावण्यासाठी परिश्रम घेतल्याचे हे फलित आहे.
>
> - डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 SEP 2025
पुण्यनगरी

# देशातील 'टॉप-५०'मध्ये शिवाजी विद्यापीठाचा समावेश

## ■ एनआयआरएफ रँकिंगमध्ये उंचावले स्थान



**कोल्हापूर :** केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या वतीने गुरुवारी जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्कमध्ये (एनआयआरएफ-२०२५) शिवाजी विद्यापीठाने देशातील आघाडीच्या २०० विद्यापीठांमध्ये स्थान कायम राखत, राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या यादीत देशातील आघाडीच्या ५० विद्यापीठांमध्ये स्थान प्राप्त केले, अशी माहिती प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी दिली.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने गुरुवारी सन २०२५ साठीची राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्कची क्रमवारी जाहीर केली. २०१६ पासून ही क्रमवारी जाहीर करण्यात येत आहे. पहिल्या वर्षीपासून शिवाजी विद्यापीठाने या क्रमवारीत देशातील २०० विद्यापीठांमध्ये स्थान कायम राखले आहे. या वर्षीही १५१-२०० या रँकबँडमध्ये शिवाजी विद्यापीठाचे स्थान कायम आहे. गतवर्षीपासून 'एनआयआरएफ'ने राज्य सार्वजनिक विद्यापीठांची क्रमवारी स्वतंत्रपणे जाहीर करण्यास सुरुवात केली. त्यानुसार गेल्या वर्षी शिवाजी विद्यापीठाचा ५१-१०० या रँकबँडमध्ये समावेश होता. यंदा क्रमवारीत आणखी आगेकूच करत १-५० या रँकबँडमध्ये स्थान प्राप्त केले. शिवाजी विद्यापीठ आता ५१.८० गुणांकनासह ४५ व्या स्थानी पोहोचले आहे, असेही त्यांनी सांगितले.

> "राष्ट्रीय पातळीवरील या क्रमवारीमध्ये राज्य सार्वजनिक विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठाने मोठी झेप घेऊन राष्ट्रीय स्तरावर अभिमानास्पद कामगिरी नोंदवली आहे. सहभागी होणाऱ्या समग्र शैक्षणिक संस्थांची संख्या वाढती असतानाही शिवाजी विद्यापीठाचे या क्रमवारीतील स्थान उंचावले आहे. एनआयआरएफच्या निकषांनुसार विद्यापीठातील शिक्षक, संशोधकांसह सर्वच घटकांनी कामगिरी उंचावण्यासाठी परिश्रम घेतल्याचे हे फलित आहे.
>
> **- कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 SEP 2025
सकाळ

# शिवाजी विद्यापीठ देशातील 'टॉप-५०' राज्य विद्यापीठांत

कोल्हापूर, ता. ४ : केंद्रीय शिक्षण मंत्रालयातर्फे आज जाहीर झालेल्या राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ-२०२५) मध्ये शिवाजी विद्यापीठाने देशातील आघाडीच्या २०० विद्यापीठांमध्ये आपले स्थान कायम राखले. त्यासह राज्य सार्वजनिक विद्यापीठांच्या यादीत आगेकूच करीत देशातील आघाडीच्या ५० विद्यापीठांमध्ये स्थान प्राप्त केले असल्याची माहिती प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली.

या रँकिंगमध्ये सहभागी होणाऱ्या शैक्षणिक संस्थांची संख्या वर्षागणिक वाढत जात असतानाही शिवाजी विद्यापीठाने आपले स्थान कायम राखले आहे. यावर्षीही १५१-२०० या रँकबँडमध्ये शिवाजी विद्यापीठाचे स्थान कायम आहे. गतवर्षीपासून 'एनआयआरएफ'ने राज्य सार्वजनिक विद्यापीठांची क्रमवारी स्वतंत्रपणे जाहीर करण्यास सुरवात केली. त्यानुसार गेल्या वर्षी शिवाजी विद्यापीठाचा या यादीमध्ये ५१-१०० या रँकबँडमध्ये समावेश झालेला होता. यंदा शिवाजी विद्यापीठाने क्रमवारीत आणखी आगेकूच करीत १-५० या रँकबँडमध्ये स्थान प्राप्त केले आहे.

> राष्ट्रीय पातळीवरील या क्रमवारीमध्ये राज्य सार्वजनिक विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठाने मोठी झेप घेऊन राष्ट्रीय स्तरावर अभिमानास्पद कामगिरी नोंदविली आहे. सहभागी होणाऱ्या समग्र शैक्षणिक संस्थांची संख्या वाढती असतानाही शिवाजी विद्यापीठाचे या क्रमवारीतील स्थान उंचावले आहे.
>
> **-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 SEP 2025
लोकसत्ता

# वि. स. खांडेकर यांचे साहित्य बंदा रुपयाप्रमाणे - डॉ. दिगंबर शिर्के



नंदादीप या ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत डॉ. विलास शिंदे, अनिल मेहता, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अवनीश पाटील.

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**कोल्हापूर :** ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक वि.स. खांडेकर यांचे साहित्य आजही बंदा रुपयाप्रमाणे खणखणीत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी मंगळवारी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे वि.स. खांडेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रामधील निवडक व्याख्यानांचे 'नंदादीप' या डॉ. रणधीर शिंदे व डॉ. नंदकुमार मोरे संपादित ग्रंथाचे डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी माझ्या घडण्याचे संपूर्ण श्रेय हे खांडेकरांचेच असल्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला. प्रकाशक अनिल मेहता यांनी खांडेकरांचे समग्र साहित्य वाचकांना सादर करण्याचा आगळा आनंद वाटत असल्याचे सांगितले. खांडेकर यांचे लेखनिक म्हणून काम पाहिलेल्या राम देशपांडे यांनी खांडेकर हे माणूस म्हणून किती उच्च कोटीचे होते, हे दर्शविणाऱ्या आठवणी सांगितल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 SEP 2025
तरुण भारत

# वि. स. खांडेकर यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन




कोल्हापूर :वि. स. खांडेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या पुतळ्यास अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ साहित्यिक वि.स. खांडेकर यांचे साहित्य आजही बंदा रुपयाप्रमाणे खणखणीत आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे वि.स. खांडेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित चर्चासत्रामधील निवडक व्याख्यानांचे 'नंदादीप' या डॉ. रणधीर शिंदे व डॉ. नंदकुमार मोरे संपादित ग्रंथाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, खांडेकर यांच्या सुवर्णस्मृती वर्षाचा आरंभ हा या ग्रंथाच्या प्रकाशनाने होतो आहे, याचा आनंद वाटतो. या निमित्ताने पुढील वर्षभरात विद्यापीठाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, यासाठी मराठी विभागाने पुढाकार घ्यावा, अशी सूचना त्यांनी केली.

डॉ. सुनीलकुमार लवटे म्हणाले, माझ्या घडण्याचे संपूर्ण श्रेय हे खांडेकरांचेच आहे. त्यांच्या ऋणातून उतराई होण्यासाठीच त्यांच्या अप्रकाशित साहित्याचे प्रकाशन करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. येत्या वर्षभरात खांडेकरांचे ३ प्रस्तावना खंड, २ समीक्षा खंड, २ कादंब्रया, १ चरित्रग्रंथ, १ पत्रसंग्रह प्रकाशित केले जाणार आहेत. स्वागत व प्रास्ताविक डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रभंजन माने, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. दत्ता मचाले, डॉ. सुखदेव एकल, रवी लोंढे आदी उपस्थित होते.

# पीएच. डी. ची यंदा बिग भरती

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पीएच. डी. च्या रिक्त जागांसाठी दरवर्षी परीक्षा होत असते. परंतू यंदा सगळ्यात जास्त जागा रिक्त आहेत. प्रवेशपूर्व परीक्षा नऊ व दहा सप्टेंबरला घेतली जाणार आहे.

दीड वर्षापासून विद्यार्थ्यांना इंटरनेट, प्रवेशापासून, पीएच. डी. जाहीर होईपर्यंत ऑनलाईन सुविधा दिल्या आहेत. तसेच ज्या दिवशी व्हायवा होईल त्याच दिवशी पदवी जाहीर झाल्याचे सर्टिफिकेट दिले जाते. मार्गदर्शक शिक्षकांनाही ऑनलाईन सुविधा दिल्या. यामुळे थिसेस तपासण्यापासून ते ऑनलाईन व्हायवादेखील घेतला जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी तीन ते पाच वर्षाचे संशोधन दोन ते तीन वर्षातच पूर्ण केले. पीएच. डी. संशोधन करु इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगली संधी मिळाली आहे. त्यामुळे ६१९ जागांसाठी तब्बल २ हजार ९५६ विद्यार्थ्यांनी अर्ज भरला. मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या सगळ्यात १०२ जागा रिक्त आहेत. त्यापाठोपाठ केमेस्ट्रीच्या ९१ जागा रिक्त आहेत. त्यामुळे या विषयाच्या विद्यार्थ्यांना संशोधनाची जास्तीत जास्त संधी मिळाली. या जागांसाठी स्पर्धा असल्यानेच क्षमतेपेक्षा चौपट विद्यार्थ्यांनी अर्ज भरले. पीएच. डी. ऑनलाईन प्रक्रियेचे संपूर्ण काम पीजीबीयुटीआर विभागाचे उपकुलसचिव डॉ. विलास सोयम पाहतात.

**शिवाजी विद्यापीठांतर्गत ४२ विषयांच्या पीएच. डी. च्या ६१९ जागा रिक्त झाल्या आहेत. त्यांना २४५ मार्गदर्शक आहेत. प्रवेशपूर्व परीक्षेसाठी २ हजार ९५६ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले. पीएच. डी. च्या प्रवेशापासून ते पदवी जाहीर होईपर्यंत संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन केली आहे. त्यामुळे यंदाच्या पीएच. डी. च्या बिग भरतीकडे शिक्षण वर्तुळाचे लक्ष लागले आहे.**



- सर्व ऑनलाईन प्रकियेमुळे वेळेची मोठी बचत
- शिवाजी विद्यापीठातील ४२ विषयांसाठी ६१९ विद्यार्थ्यांना प्रवेश
- २,९५६ विद्यार्थ्यांनी भरले अर्ज
- प्रवेशपूर्व परीक्षा नऊ, दहा सप्टेंबरला

### या सुविधा मिळतात

पीएच. डी. थिसेस पूर्वी सहा प्रतीमध्ये सादर करावा लागत होता. आता ग्रंथालयासाठी एकच थिसेस घेतला जातो.

### पीएच. डी. ची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन

विद्यार्थी हित लक्षात घेऊन प्रवेशापासून ते पीएच. डी. पदवी जाहीर होईपर्यंत सर्व प्रक्रिया ऑनलाईन आहे. यंदा सगळ्यात जास्त जागा रिक्त झाल्या आहेत. प्रवेश परीक्षेनंतर रिसर्च रिकग्नेशन कमिटी, रिसर्च ॲडव्हायझरी कमिटीसही लॉगईनमधून काम करता येते.

**– डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ**

### विषय अन् विद्यार्थी संख्या

अकौंटन्सी ३, आर्किटेक्चर ८, बायोकेमेस्ट्री ३, बायो–टेक्नॉलॉजी ५, बॉटनी १२, बिझनेस इकॉनॉमी ६, बिझनेस मॅनेजमेंट १२, केमिकल इंजिनिअरिंग १२, केमेस्ट्री ९१, सिव्हील इंजिनिअरिंग ३, कॉमर्स २४, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन फॅकल्टी ऑफ कॉमर्स ॲण्ड मॅनेजमेंट ६, कॉम्प्युटर सायन्स ४, कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग २६, इकॉनॉमिक ६, इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंग २४, इकॉनॉमिक्स फॉर एमएस्सी स्टुडन्स ४, इलेक्ट्रॉनिक ॲण्ड इंजि. एम. टेक. १०, इलेक्ट्रॉनिक ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग ४२, इंग्लिश ३६, इन्व्हारमेंटल सायन्स २, इन्व्हारमेंटल सायन्स ॲण्ड इंजिनिअरिंग १०, फुड सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी २, जिओग्राफी ४, जिओलॉजी २, हिंदी ८, हिस्ट्री ३, लॉ १, लायब्ररी ॲण्ड इन्फर्मेशन सायन्स २, मराठी २६, मॅथॅमेटिक्स ३, मेकॅनिकल इंजिनिअरिंग १०२, मायक्रॉलॉजी २२, नॅनो सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी ६, फार्मसी १५, फिजिक्स २०, पॉलिटिकल सायन्स ४, सायकॉलॉजी ४, सोशालॉजी २, स्टॅटिक्स ६, टेक्स्टाईल इंजिनिअरिंग ३४, झुलॉजी ४ अशी एकूण ६१९ आहेत.

0 5 SEP 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘उच्च शिक्षण’ सहसंचालकपदी डॉ. प्रकाश बच्छाव

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ४ : कोल्हापूर विभागीय उच्च शिक्षण सहसंचालकपदी डॉ. प्रकाश बच्छाव यांची राज्य शासनाने नियुक्ती केली आहे. त्याबाबतचा आदेश उच्च व तंत्रशिक्षण विभागाने आज काढला. सध्या डॉ. बच्छाव यांच्याकडे या सहसंचालकपदाचा अतिरिक्त कार्यभार आहे.

राज्यातील दहा उच्च व तंत्र शिक्षण विभागीय सहसंचालक आणि दोन शिक्षण संचालकांचा कार्यकाळ संपणार आहे. त्या रिक्त होणाऱ्या जागांवर नूतन सहसंचालक, संचालक



**डॉ. प्रकाश बच्छाव**

नियुक्तीची प्रक्रिया उच्च व तंत्र शिक्षण विभागाने सुरू केली. शासनाने नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीने पुणे येथे २२ ऑगस्टला ५१ उमेदवारांच्या मुलाखतीची प्रक्रिया पूर्ण केली. त्यानंतर उच्च व तंत्रशिक्षण विभागाने आज विभागीय सहसंचालक नियुक्तीचा आदेश काढला. उच्च शिक्षण विभागाने तत्कालीन विभागीय सहसंचालक डॉ. धनराज नाकाडे यांची छत्रपती संभाजीनगर येथे बदली केली. या सहसंचालकपदाचा अतिरिक्त

> पाच महिन्यांतील कोल्हापूर विभागामधील काम विद्यापीठाच्या सर्व घटकांनी पाहिले आहे. ई-ऑफिस प्रणाली सुरू केली आहे. रोज कार्यवाही केलेल्या प्रकरणांची माहिती सहसंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर दिली जाते. शासनाने आता माझ्याकडे सहसंचालक पदाचा पूर्णवेळ कार्यभार सोपविला आहे. या कार्यालयाचे कामकाज आणखी पारदर्शक, गतिमान करणार आहे.
>
> **-डॉ. प्रकाश बच्छाव**

कार्यभार डॉ. बच्छाव यांनी ३० मार्चला स्वीकारला. त्यानंतर त्यांनी ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित केली. प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही केली. नूतन सहसंचालकांच्या नियुक्तीचा शासनाने काढलेल्या आदेशामध्ये डॉ. बच्छाव यांच्याकडे कोल्हापूर विभागीय सहसंचालकपदाचा कार्यभार सोपवला आहे. दरम्यान, राजाराम महाविद्यालयातील प्रा. डॉ. बाबासाहेब भोसले यांच्याकडे उच्च शिक्षण सहसंचालक नांदेड विभागाचा, तर प्रा. डॉ. अजयकुमार जाधव यांच्याकडे उच्च शिक्षण सहसंचालक सोलापूर विभागाचा अतिरिक्त कार्यभार शासनाने सोपविली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 SEP 2025
तरुण भारत

# कोल्हापूर विभागीय सहसंचालकपदी डॉ. प्रकाश बच्छाव

**कोल्हापूर :** कोल्हापूर विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक पदी डॉ. प्रकाश बच्छाव यांची गुरुवारी पूर्णवेळ म्हणून नियुक्ती करण्यात आली. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने गुरुवारी रात्री उशिरा याबाबतचा आदेश काढला. उच्च शिक्षण विभागाने तत्कालीन विभागीय सहसंचालक डॉ. धनराज नाकाडे यांची छत्रपती संभाजीनगर येथे बदली केली. त्यांचा



पदाचा अतिरिक्त कार्यभार उच्चशिक्षण विभाग पुणे कार्यालयातील सहसंचालक (प्रशासन) डॉ. बच्छाव यांच्याकडे सोपविण्यात आला होता. त्यानंतर राज्य सरकारने सर्व विभागीय सहसंचालकांची रिक्त पदे भरण्यासाठी मुलाखती घेतल्या. त्यातून कोल्हापूरच्या विभागीय सहसंचालक पदी डॉ. बच्छाव यांची पूर्णवेळ नियुक्ती करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 5 SEP 2025
सकाळ

# शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत पवार, थोरात, शेख


अंकिता पवार


ऐश्वर्या थोरात


फिजा शेख

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ यांनी मेमध्ये घेतलेल्या एम.कॉम. आय.टी. परीक्षेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर केली. राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजच्या एम.कॉम.आय.टी. विषयातील अंकिता पवार, ऐश्वर्या थोरात, फिजा शेख यांनी शिवाजी विद्यापीठात एम.कॉम. आय.टी. विषयात विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत मान मिळविला. या कोर्समुळे सॉफ्टवेअर डेव्हलपर, वेबसाईट डेव्हलपर, मशीन लर्निंग इंजिनिअर, सिस्टीम इंजिनिअर क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधीबरोबरच स्टार्टअप इंडिया या शासकीय योजनेतून स्वयंरोजगाराच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. डी. आर. भोसले यांनी केले आहे. कोर्सच्या माध्यमातून आगामी काळातील रोजगारापर्यंत पोहोचण्यासाठी विद्यार्थ्यांनी एम.कॉम.आय.टी. मार्ग अंगिकारावा, असे विभागप्रमुख प्रा. एन. एस. यादव यांनी सांगितले. सरोज पाटील (माई), महाविद्यालय विकास समितीच्या चेअरमन व रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या संगीता पाटील, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य व रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्य प्रशांत पाटील, डॉ. भोसले यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. प्रा. यादव, प्रा. एस. वाय. बावणे यांचे सहकार्य लाभले.